भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०७/२०१७

**१) सगनमताने सरकारी जमीनीच्या जागेत विनापवानगीने प्लॉट पाडुन खोटे दस्ताऐवज तयार करुन प्लॉटची विक्री केल्याने गुन्हा नोंद . :–**

सन २००१ पासुन आजपर्यत यातील सहाही आरोपीतांनी समता नगर फेज मधील १८२ प्लॉट बनविण्याची लिखीत मंजुरी व खाजगी ले आऊट नकाशानुसार इतर आरोपीतांनी संगनमताने नियोजीत जागेत ६ जास्तीचे प्लॉट व नियोजीत जागे व्यतीरिक्त भुमापन नं. २/१ मेंढा तलावाच्या सरकारी जमीनीमधील जागेत विनापरवानगीने ३८ प्लॉट बनवुन मुख्य खाजगी ले आऊट च्या नकाशात बेकायदेशीर बदल करुन व शासकीय नकाशा न करता व शासनाची कोणतीही परवानगी न घेता इतर आरोपीतांनी संगनमताने भुमापन क्र. २/२ चे अकृषक आदेशावरच खोटे दस्ताऐवज तयार करुन जास्तीच्या प्लॉटची विक्री करुन सामान्य जनता व शासनाची दिशाभुल केल्याने फिर्यादी गोपीचंद तुळसीराम कोरे वय ६६ वर्ष, राच समता नगर मेंढा यांचे बयान व मा. सह दिवाणी न्यायाधिश क स्तर भंडारा यांचे पत्र क्र. २८६/१७ दि. ११/०७/२०१७ चे आदेशान्वय वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०,४२७,४६७,४७१,१२०(ब) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घरात प्रवेश करुन सोन्याचे सामान व २ मोबाईलची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ११/०७/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी धामदेव तुळशिराम सिलेकर वय ५४ वर्ष, रा. राम मंदीर वार्ड राष्ट्रवादी ऑफीस जवळ भंडारा याचे वरचे घराचे स्लॅप वरील खुल्या खिडकीतुन कोणीरती अज्ञात चोराने आत प्रवेश करुन किचन रुम मधील कपाटात ठेवलेली १ सोन्याची काळीपोथ ०६ ग्रॅम, १ सोन्याची नथ २.५ ग्रॅम, लेनीओ कंपनीचा १ मोबाईल, १ मॅक्स कंपनीचा मोबाईल असा एकुण २०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कावळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) महिलेस क्षुल्लक कारणावरुन शिवीगाळ करुन लाथा बुक्यांनी मारहान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०७/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. किरण राजेश गजभिये वय २८ वर्ष, रा. एमएसईबी कॉलोनी राजीव गांधी चौक भंडारा ही आपले घरी हजर असतांना तिला तिचे आरोपी पतीने 'तु स्वयंपाक का करत नाही' असे बोलुन फिर्यादीस शिवीगाळ करुन तिचे गालावर, पाठीवर, छातीवर, लाथा बुक्यांनी मारहान केल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. उबाळे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन रोडवरुन लोकानां जाण्या – येण्याच्या रस्त्याने मनाई करुन ट्रॅक्टरने तोडफोड करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने व सार्वजनीक संपत्तीची नुकसान केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील आरोपीतांनी महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत ग्रामपंचायत मोहदुराने बनविलेला रोड यातील आरोपीतांनी संगनमत करुन जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना मनाई करुन तो रोड ट्रॅक्टरने तोडफोड करुन सार्वजनीक संपत्तीचे नुकसान करुन व जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना जावु नका असे म्हणुन मारण्यापिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३४१,५०६,३४ भादंवि. सहकलम ३ सार्वजनिक संपत्तीची हानी प्रती अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास सपोनि. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन लोखंडी पट्टीने मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०७/२०१७ चे २०.३० वा. दर. यातील आरोपीतांनी संगनमत करुन आरोपी क्र. १ याने दिनांक १०/०७/२०१७ ला तु माझ्या भावाला का मारला व आरोपी क.२ ने तुने मला का मारले असे फिर्यादीस बोलुन भांडण करुन आरोपी क्र. १ ने चाकुने व आरोपी क्र. २ ने लोखंडी पट्टीने फिर्यादीचे डावे हाताचे कोनीवर, कपाडावर, डोक्यावर, उजवे बाजुचे गळयावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सशिकांत वामन तुपारे वय २७ वर्ष, रा. पालोरा चौरास यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,५०४,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. जाधव पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**६) मोळी बांधकामाकरीता सेंट्रीगला लावलेले लोखंडी प्लेटची चोरी . :–**

दिनांक १०/०७/२०१७ चे १७.०० ते ११/०७/२०१७ चे ०९.०० वा. दर. यातील फिर्यादी विलास आनंदराव हत्तीमारे वय ४० वर्ष, रा. ढिवरखेडा याने आपले मोळी बांधकामाकरीता सेंट्रीगला लावलेले लोखंडी प्लेट किंमती ३१,२००/–रु. चे यातील संशयीत आरोपीने चोरुन नेल्याचा संशय दर्शविल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला पुढील तपास पोहवा. राऊत पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**७) अवैध दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक १२/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे वरठी, सिहोरा व साकोली येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३३ लिटर हातभट्टी दारु किमती. २,५४०/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(एम.एम. सिडाम)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.